Pimpri Chinchwad Police Commissionerate

# प्रेस नोट ता.१२/११/२०२०

## जबरी चोरीचे गुन्हे करणा-या २ गुन्हेगारांना अटक

## गुन्हे शाखा युनिट २ ची कारवाई

निगडी पोलीस ठाणे हदीत ट्रान्सपोर्टनगर येथे दिनांक ३/१०/२०२० रोजी कामानिमित आलेले अगरवाल पॅकर्स ॲन्ड मुव्हर्स लि.प्रितमपुरा शाखा दिल्ली मध्ये जनरल मॅनेजर म्हणुन काम करणारे श्री प्रदीपकुमार श्रीरतनलाल गोयल हे सायंकाळी ७.१५ वा.चे सुमारास ट्रान्सपोर्ट नगर येथील हॉटेल वृंदावन येथे लॅपटॉपची सॅकसह पायी चालत जात असतांना पीएमपीएमएल डेपाचे समोर अंदाजे २० ते २२ वर्षे वयाच्या दोघांनी व त्यांचा मोपेड गाडीवरुन आलेला तिसरा साथीदार अशांनी लॅपटॉपची बॅग व त्यांचा मोबाईल जबरदस्तीने हिसकावुन नेल्याने निग डी पोलीस ठाणेत श्री प्रदीपकुमार गोयल यांनी दिले फिर्यादीवरुन जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा गुन्हे शाखा युनिट २ कडून समांतर तपास करीत असतांना पोलीस नाईक जमीर तांबोळी यांना त्यांचे गोपनीय बातमीदाराकरवी मिळाले बातमीवरुन पोलीस हवालदार दिपक खरात, प्रमोद वेताळ, पोलीस नाईक विपुल जाधव व जमीर तांबोळी यांनी अंकुश बोरोडे चौक ओटास्किम या ठिकाणी सापळा लावुन मोपेड गाडी नंबर एम एच १४ जेसी ०४८४ या गाडीवरुन आलेल्या आरोपीत नामे आयुब चमन खान वय २२ वर्षे रा.ओटास्किम निगडी व इमतेज मुस्ताक शेख वय २४ वर्षे रा.सदर यांना शिताफीने ताब्यात घेवून मोपड वाहनाचे डिक्कीची तपासणी केली असता त्यामध्ये एकूण १२ महागडे मोबाईल, लॅपटॉपचे तुकडे असे मिळुन आल्याने त्यांचेकडे विचारपुस करता त्यांनी व त्यांचा तिसरा साथीदार मनोज जाधव अशांनी मिळुन पिंपरी चिंचवड परिसरात जबरी चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली. आरोपीत नामे इमतेज मुस्ताक शेख याचेवर दोन खुनाचे गुन्हे दाखल असुन सध्या तो जेलमधुन पॅरोलवर सुटला आहे तसेच आयुब खान हा हिंजवडी पोलीस ठाणेकडील गुन्हयामध्ये पाहीजे आरोपी आहे. आरोपीत यांचेकडून एकूण १३८५००/- रुपयाचा मुदेमाल जप्त करुन ट्रान्सपोर्ट नगर येथे घडलेल्या गुन्हयामध्ये अटक केली आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री कृष्ण प्रकाश, अप्पर पोलीस आयुक्त श्री रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री सुधीर हिरेमठ, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे श्री आर आर पाटील यांचे

मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट २ चे पोलीस निरीक्षक शैलेश गायकवाड, पोलीस उप निरीक्षक संजय निलपत्रेवार, पोलीस अंमलदार  जमीर तांबोळी, दिपक खरात, प्रमोद वेताळ, विपुल जाधव, शिवानंद स्वामी, केराप्पा माने, दिलीप चौधरी, वसंत खोमणे, मपोहवा उषा दळे, जयवंत राऊत, नामदेव राऊत, अजित सानप आतिष कुडके,  यांचे पथकाने केली आहे.

